# गाभाऱ्यातली माणसं

गिरिजा कीर

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**गाभाऱ्यातली माणसं**
गिरिजा कीर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
गिरिजा कीर
५, झपूर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पू.) मुंबई- ५१
फोन नं. ०२२-२६५९०८८२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २८०/-

# धूळभेट

संध्याकाळची वेळ असते. दूर कुठेतरी ताशा वाजत असतो. बोटांनी उगाचच ताल धरलाय. पाहता पाहता अंधार भरून येतो. घरात, बाहेर... सगळीकडेच. एकदम शांत शांत होतंय. मी एकटीच असते. मन धपापतं. जणू एकटेपणाचं, अंधाराचं भय वाटतं. कुणाशी तरी बोलावंसं वाटतंय... अगदी मनातलं... काहीतरी...

मग वाटतं, इथं इथं कुणीतरी आहे. डोळे ताणून मी समोरच्या पोकळीत पाहाते... एक काटकुळी आकृती दिसते... औदुंबरकाकांची.

मुरुडच्या चौदा खोल्यांच्या बंगल्यातून सरसर फिरणारे विजेरी डोळे दिसतात... माटूचे.

एक हसरा जीवंत स्वर ऐकू येतो... ''के... सरा... सरा... व्हॉटेवर विल बी, विल बी...''

कुठून आले हे स्वर...? धरतीच्या गर्भातून? वाऱ्याच्या शिळेतून? वातावरणाच्या पोकळीतून...?

मी पाहते... अनेक चेहरे! अनंत आवाज... मी बोलायला लागते... कागदांशी, शाईशी, मनाशी. त्या जाणवणाऱ्या, पण न दिसणाऱ्या आठवणींशी!

मी लिहितेय... हसतेय... रडतेय... फुलतेय... मलूल होतेय. माझ्या भावविश्वात मी मस्त आहे! या भावविश्वाचं नाव... गाभाऱ्यातली माणसं!.... 'अनुराधे'च्या दर अंकातून एक नवा 'माणूस' भेटून जातोय... वाचकांची पत्रं येतायत. कुणी भेटायला येतंय. मोठी मजा आलीय. एका वेगळ्याच जगात, 'रमा' होऊन मी वावरतेय.

'या' मूडमध्ये मी कुठं जातच नाही. कुणी टोमणे मारतं... 'चोवीस तास लिहीतच असता काय?... घराबाहेर यायला सवडच होत नाही वाटतं?'...

एक ना दोन. लोकांना रिकामपणी आमच्यासारखी तोंडीलावणी हवीच असतात. एकदा एका गृहस्थांनी विचारलं,

'रोज गॅलरीत बसून वेळ का घालवता?'...

'वेळ कुठे घालवते? पाहते... विचार करते... बोलते...'

'काय पाहता? समोर होस्टेल तर आहे...'

मी हसले. बोलणाऱ्याची कीव येते... अरे, समोर मोकळं आकाश आहे. त्यात डोकावून पाहा तर! डाव्या हाताला खाडी आहे. रात्रीचे दिवे लुकलुकतात... खुसूखुसू हसतात. रस्त्यावरनं गाईगुरं जातात. मेंढ्यांचे कळपच्या कळप....किती छान वाटतं पाहायला! मुलं-मुली वेगवेगळ्या पोषाखात हसत-खिदळत फिरत असतात... केवढा उत्साह... केवढा आनंद...! निसर्गाचं, जगाचं सगळं अप्रूप असं एका कोपऱ्यात बसून डोळे भरून पाहायला मला फार फार आवडतं...

रात्रीच्या वेळी अंधारात पाहिलं की, अंत:करणाची कवाडं खुली होतात. मनाचं अंधाराशी नातं जमतं. व्यथेचा सूर अंधाराला कळतो. कुणीतरी आतून साद घातल्यासारखी वाटते. 'ही बाई वेडी आहे' अशा नजरेनं तो माणूस माझ्याकडे बघतो. माझी भाषा न कळणाऱ्यांच्या जगात जायला मला भीती वाटते. अशा माणसांपासून मी दूर पळते.

सुदैवानं 'गाभाऱ्यातली माणसं' जाणून घेणारे अनेक जण भेटले. कुणी पत्रानं, कुणी भेटून तर कुणी फोनवर अभिनंदन केलं. कौतुकाचे फूलतुरे झेलत मी लिहीत राहिले. वाचकांची पत्रं येत राहिली... ही सगळी खरीखुरी माणसं आहेत का?

होय! ही खरंच खरी माणसं... हसणारी, रुसणारी, पोटभर माया करणारी नि आतडी तुटून रडणारी...

कुणी विचारतात... 'यांची नावं सांगा... पत्ते कळवा...' यांची नावं काय सांगू? नाव सांगितलं की, त्यातलं काव्य संपलं. माझ्या मनाला ती जशी दिसली, तशी रंगवली. नाव, हुद्दा, दर्जा काहीही मला ठाऊक नाही. मला जाणवलं ते त्यांचं माणूसपण!

ज्याला वेडा म्हणून जगानं लाथाडलं, त्यानं माझ्या दारात बसून गोळाभर भातासाठी कृतज्ञतेची आसवं ढाळली... तो काय वेडा?

जन्मभर व्यथेची वस्त्रं लेऊन जिनं दारिद्र्याची लाज लपवली, ती का गरीब?

आकाशाच्या छपराखाली पुस्तकांचा संसार मांडणारा 'गृहस्थ' मी पाहिला. पित्याच्या मायेनं पुस्तकं जवळ करणारा तो ऋषी... मी तुसडा कशी म्हणू! ... व्यवहाराच्या तराजूत ही माणसं कशी तोलू? मिरचीचे नि गुळाचे भाव करता येतात. हे जग मुळी हिशेबाचं नव्हेच. इथलं देणं-घेणं पार वेगळं! या माणसांनी तर मला हसती, बोलती केली. प्रेम दिलं. जगायचं कसं ते दाखवून दिलं... 'बाई ग, तुला द्यायला हे एवढंच आमच्याजवळ आहे...'

ही माणसं म्हणजे माझ्या जगण्याची शक्ती! त्यांचा कृतज्ञ आठव पुढल्या पानापानांतून आहे.

'गाभाऱ्यातल्या माणसां'पैकी आज जी हयात नाहीत, त्यांचं हे पुण्यस्मरण! कुणी कुठं कुठं, जगाच्या पाठीवर आहेत. ज्यांनी वाचलं, त्यांनी गहिवरून निरोप धाडले. हा अश्रूंचा नजराणा हे माझं फार मोठं धन.

....या गाभाऱ्यात दिव्यांची आरास नाही, फुलांची महिरप नाही की, कुठल्या दगडी मूर्तीची पूजा बांधलेली नाही... मनाच्या सनईतून निघालेल्या भक्तिगीतांनी हा गाभारा भरला आहे. हा स्वर... हा भाव... ही श्रद्धा, वाटते का ओळखीची, तुमची... तुमच्या मनाच्या गाभाऱ्यातली?

माझ्या वेड्याबागड्या भावबोलीतून तुम्हाला तुमची माणसं ओळखता यावीत, तुमच्या माझ्या आत्म्याचा सूर जुळावा. सूर जुळण्याचा तो तेवढा क्षण... माझ्या तृप्तीचा!

**- गिरिजा कीर**

१६.३.७२<br>
वर्ष प्रतिपदा<br>
झपूर्झा, साहित्य सहवास,<br>
वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | वहिनीबाय | ९ |
| २. | 'डॅफोडिल' बाबू | १६ |
| ३. | औदुंबर काका | २७ |
| ४. | शहाणुला खुळा! | ४१ |
| ५. | माई | ५२ |
| ६. | म्हातारबाबा | ६४ |
| ७. | भाऊसाहेब | ७४ |
| ८. | माटू | ९३ |
| ९. | रजपूत बाबू | ११५ |
| १०. | कवी | १२६ |
| ११. | नीलमपरी | १३९ |
| १२. | प्रोफेसर | १५२ |
| १३. | बाई | १७१ |
| १४. | तात्या | १८१ |
| १५. | मीरा | १९४ |
| १६. | बापू | २०७ |
| १७. | पद्मावती | २१९ |


✦✦✦

# वहिनीबाय

आंबोलीच्या घाटातून गाडी चढू लागली की, माझं मन वेडंपिसं होतं. व्यवहाराची बंधनं दूर कुठे निखळून पडतात. कंच हिरवा चुडा ल्यायलेली कोकणची लाजरी सृष्टी मला खुणावते. 'आलीस? ये, ये गं!' अन् या हाकेसरशी मला आडेलीचं घर दिसू लागतं.

डोक्यावर पदर घेऊन विनयानं उभ्या असलेल्या शहाण्णव कुळीच्या मराठ्याच्या स्त्रीसारखं आमचं हे घर, डोंगराच्या माथ्यावर स्वत:चा कौलारू पदर सांभाळत मोठ्या डौलानं उभं आहे. राजेरजवाड्यांची छत्रचामरं नसलेल्या या घराच्या दाराशी उभे आहेत नारळी-पोफळीचे-भालदार-चोपदार. डेरेदार फणस मिशीवाल्या गुरख्याच्या रुबाबात खडा आहे. अन् या पुरुषी स्वागतानं पाहुण्यानं बावचळून जाऊ नये म्हणून खळ्यात तिष्ठत आहे विनम्र सावळी तुळस.

तुळशीचं माहात्म्य धार्मिक दृष्टीनं कितीही असो, पण आमच्या दारची तुळस पाहिली की मला मात्र आठवण होते आमच्या भोळ्या-भाबड्या वहिनीबायची. म्हणजेच घराच्या वृंदावनातल्या चालत्या बोलत्या तुळशीची! मुंबईकरांना ती कशी वाटेल ते सांगणं कठीण; पण माझं अन् तिचं गोत्र मात्र एकदम जमतं.

मी दारात पाऊल टाकलं की, ओसरीच्या दाराशी ती उभी असलेली मला दिसते. मला ठाऊक असतं, सकाळपासून ती सारखी तिथंच वाटेकडे डोळे लावून उभी असणार. मी नमस्काराला वाकले की, ती तोंडभर हसते. तिला म्हणायचं असतं - 'आलीस? ये. बरी आहेस बाये? किती गं सुकलीस?'... आणखी कितीतरी, पण तिच्या तोंडून मुळी शब्दच येत नाही. भरल्या डोळ्यांनी ती माझ्याकडे नुसती पाहात राहते.

मी तिच्याकडे पाहते. ती आहे तशीच आहे. गोरी, सडसडीत, बारीक तुडतुडीसारखी! नाकात सोन्याची फुली, आंबाड्यावर अबोलीचा भरगच्च वळेसर, जाड्याभरड्या साडीचे ओचे सदैव वर खोचलेले. चिटाचा कोपरापर्यंत पोहोचणारा ऐसपैस पोलका, तिच्या खेडवळपणाची साक्ष देणारा! बारीक डोळे- मुलाच्या

निरागसपणाने भिरीभिरी पाहणारे. चेहऱ्यावरच्या भाबडेपणात कारुण्याची ओलसर हळवी काडी विरघळून गेलेली. वर्षांची पावलं पुढे सरकतात ती तिला वगळूनच.

ती पुढे येऊन मुलांवरून भाकरतुकडा ओवाळून टाकते. एकाला कडेवर मारते. दुसऱ्याचं बखोटं धरते आणि माजघरातून स्वयंपाकघरात आणि स्वयंपाकघरातून माजघरात तिची लगबग सुरू होते. वर्षभराची अनेक अनेक गुपितं तिला मुलांना सांगायची असतात. मुलांसाठी राखून ठेवलेली काजूची पुरचुंडी, कालच उतरलेला कापा फणस, उद्याकरिता वेंगुर्ल्याहून मागवलेला खास 'बाजार'... आणखी कितीतरी. बऱ्याच वेळानं तिला माझी आठवण येते. मग माझ्याजवळ येत ती विचारते, ''मुम्बैची सगळी बरी आसत मा गो? अरुणा बरा आसा? तेका आवशीची आठवण येता? चार दीस सद्दीचो कावळो आरडा होतो. मी म्हटलंय, कोण येताहा मुम्बैसून? तर तुजां पत्र आयलां बग!'' (वहिनीचे उच्चार खास कोकणी ढंगाचे असतात.)

मग तिच्या बोलण्याला खंड नसतो. मनात साठलेल्या गोष्टी मैत्रिणीला सांगाव्यात एवढ्या विश्वासानं, मोकळेपणानं ती बोलत राहते. एवढ्यात पुरुष माणसं विचारतात, ''मुलं दमून आलेयत. स्वयंपाक झाला की नाही?''

'नाही' हा शब्द वहिनीबायला ठाऊकच नसतो. ''झाला हां! भाताक् आधण ठेवलंय. डाळ बरी शिजूक आयली. ही भाजी फोडणेक टाकून दोन भाकऱ्यो भाजल्यो की झालां-मगे पन्नासजण बसा जेवूक. मागे सरुचंय नाय.'' कपाळावर हात मारून मी स्वस्थ बसते. वहिनीवर रागवायचं कसं?

जेवायच्या वेळी वहिनी सर्वांना चटचट वाढते, हवं नको बघते. तिचं वाढणं घसघशीत. नव्या माणसालासुद्धा संकोच नको वाटायला. साधं आमटीभाताचं जेवण केलं तरी वहिनी सर्वांना आग्रह करून वाढते. आवडलं का म्हणून पुन्हा पुन्हा विचारते. हो म्हटलं तर आग्रहानं जेवू घालते आणि भरल्या मनानं जेवणाराकडे पाहात राहते. तिला स्वयंपाकात लुडबूड केलेली आवडत नाही हं! जे करायचं ते स्वत:च्या हातानं. मालकीण ना ती त्या घरची! तिच्या मालकीणपणाची एक छान आठवण आहे.

एकदा गंमत झाली. मुंबईहून म्हणे तिचा भाऊ आला होता. बहिणीवर भारी जीव त्याचा. तिचं दारिद्र्य बघून म्हणाला, ''माहेरी चल. तिथं सुखात राहा. तुला पोसायला मी खंबीर आहे. इथं दारिद्र्यात किती दिवस तुकडे मोडशील?'' वहिनीबायनं मान उंचावली. आपल्या घराकडे अभिमानानं बघत म्हणाली, ''दादा,